**राज्यातील पायाभूत विकास प्रकल्पासाठी महाराष्ट्र संपत्ती पंजीकरण पध्दती (महासंपत्ती)/Maharashtra Asset Registry System (MARS) या पोर्टलवरुन युनिक आयडी क्रमांक (MHUID) घेणे अनिवार्य करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्र.युपासु-२०२५/प्र.क्र.०७/का.१४१२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : १६ जुलै, २०२६.

वाचा : १. नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : युपासु-२०२५/प्र.क्र.०७/का.१४१२, दि.२४ जानेवारी, २०२५.
२. नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : युपासु-२०२५/प्र.क्र.०७/का.१४१२, दि. ९ जून, २०२५.
३. नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : युपासु-२०२५/प्र.क्र.०७/का.१४१२, दि. २५ ऑगस्ट, २०२६.

**प्रस्तावना :**

राज्यातील पायाभूत विकास कामांचे सुयोग्य नियोजन व्हावे, सुसूत्रता यावी, सर्व भागांचा समतोल विकास व्हावा व अनावश्यक खर्चात बचत व्हावी यासाठी वाचा क्र.२ येथील शासन निर्णयान्वये सर्व जिल्ह्यांमध्ये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रत्येक पायाभूत सुविधेसाठी युनिक आयडी घेणे दिनांक १.१०.२०२५ पासून अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच युनिक आयडीसाठी आकारावयाचे शुल्क आणि शुल्काच्या वापराबाबत मार्गदर्शक सूचना दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. आता, महाराष्ट्र संपत्ती पंजीकरण पध्दती (महासंपत्ती)/Maharashtra Asset Registry System (MARS) या पोर्टलच्या अंमलबजावणीच्या संदर्भात अतिरिक्त मार्गदर्शक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील सर्व शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषद, महानगरपालिका व अन्य यंत्रणा यांना प्रत्येक पायाभूत विकास प्रकल्पासाठी महाराष्ट्र संपत्ती पंजीकरण पध्दती (महासंपत्ती)/ Maharashtra Asset Registry System (MARS) या पोर्टलवरुन युनिक आयडी क्रमांक घेण्याबाबत कार्यपध्दती नमूद करण्यात आली आहे. त्यानुसार प्रत्येक विभागाला आणि स्थानिक स्वराज्य संस्थेला पायाभूत सुविधेसाठी युनिक आयडी घेणे दि.९.०६.२०२५ च्या शासन निर्णयान्वये अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये युनिक पायाभूत सुविधा पोर्टलवर सद्यस्थितीत कार्यान्वित असलेल्या व गेल्या पाच वर्षांमध्ये (२०२०-२०२५) निर्माण झालेल्या सर्व पायाभूत सुविधांच्या

नोंदी पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार पोर्टलच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अतिरिक्त मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत:-

१. प्रत्येक सार्वजनिक पायाभूत सुविधेच्या प्रशासकीय मंजुरी आदेशापूर्वी पायाभूत सुविधेचा आयडी (MHUID) घेणे अनिवार्य असून त्या संदर्भातील खात्री करण्याची जबाबदारी प्रशासकीय मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्याची राहील.

२. पायाभूत सुविधेचे देयक अदा करताना पायाभूत सुविधा आयडी असणे अनिवार्य आहे. प्रशासकीय मंजुरी आदेशामध्ये पायाभूत आयडी नमूद केलेला नसल्यास देयक अदा करण्यात येऊ नये. यासंदर्भात सर्व कोषागार अधिकारी यांना वित्त विभागामार्फत आवश्यक सूचना देण्यात याव्यात.

३. सर्व सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिनांक ०१.०४.२०२१ पासून पूर्ण झालेल्या/प्रगतीपथावर असलेल्या/प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या पायाभूत सुविधांची नोंद दिनांक ३०.०९.२०२६ पर्यंत विशेष मोहिम राबवून पूर्ण करणे बंधनकारक आहे.

४. उपरोक्त अनुक्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या नोंदीशिवाय दिनांक ०१.०४.२०२१ पूर्वीच्या पायाभूत सुविधांची नोंद देखील महाराष्ट्र संपत्ती पंजीकरण पध्दती (महासंपत्ती) पोर्टलवर कालबध्द पध्दतीने घेण्यात यावी.

५. उपरोक्त नमूद नोंदी या अचूक व दर्जेदार होतील याची खात्री संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी करावी.

६. सर्व जिल्हाधिकारी यांनी आपल्या जिल्ह्यातील लिगसी डेटा महासंपत्ती पोर्टलवर पूर्णपणे अपलोड केला असल्याची खात्री करावी.

प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०७१६१२२६०६९९१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAJESH AGGARWAL
Date: 2026.07.16 16:31:44 +05'30'

**( राजेश अगरवाल )**
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा. उप सभापत्ती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
९. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव मंत्रालय, मुंबई,
१०. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
११. मा. उप मुख्यमंत्री (रा.उ.शु.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
१३. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
१४. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), विधानभवन, मुंबई,
१५. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), विधानभवन, मुंबई,
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१७. सर्व विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी,
१८. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
१९. आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई,
२०. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपुर,
२१. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपुर,
२२. संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२३. संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन व उपयोजन केंद्र, नागपूर,
२४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२५. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी,
२६. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
२७. निवडनस्ती, कार्यासन-१४१२, नियोजन विभाग.